# *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – ५०२/२०२२/अहमदनगर**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.सरदार अमिर शेख,<br>रा.३५/१५, स्कीम नं.११,<br>सेक्टर नं.२१, निगडी पुणे-४४. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय, मांजुरी,<br>ता.राहुरी, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>सहायक गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, राहुरी,<br>ता.राहुरी, जि.अहमदनगर. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक – १२/०१/२०२३**

अपिलार्थी यांनी दिनांक ०७/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी विलंबाने अपूर्ण माहिती पुरविली, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक १२/०१/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** अपिलार्थी वगळता अन्य पक्षकार उपस्थित

अपिलार्थी यांनी दिनांक ०९/०२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांचे दिनांक २५/०९/२०१९ पत्राप्रमाणे सन १९५६ ते २०१९ या कालावधीतील उतारे देण्यात यावीत. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९/०४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ०९/०२/२०२१ रोजीचा माहिती अर्ज दिनांक ०६/०४/२०१९ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने १० प्रतीसाठी रुपये २०/- व पोस्ट खर्च रुपये ६०/- असे एकूण रुपये ८०/- भरणेबाबत कळविले. त्यानुसार अपिलार्थी यांनी दिनांक ०५/०५/२०२१ रोजीच्या पत्रान्वये रुपये ८०/- माहिती शुल्क चेकद्वारे पाठविले.

दरम्यानच्या कालावधीत अपिलार्थी यांनी दिनांक ०५/०४/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दिनांक ०७/०६/२०२१ रोजी निर्णय पारीत करुन अपिलार्थीस माहिती शुल्क कळविले आहे त्यानुसार अपिलार्थी यांनी माहिती शुल्क भरले असल्याने सदर माहिती पुरविण्यात यावी, असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०९/०२/२०२१ (प्राप्त दिनांक ०६/०४/२०२१) रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक २९/०४/२०२१ च्या पत्रान्वये माहिती शुल्क कळविले. अपिलार्थी यांनी माहिती शुल्क भरल्यानंतर दिनांक ०२/०६/२०२१ अन्वये माहिती पुरविली असल्याचे दिसून येते.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात अपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याचे नमूद केले असल्याने आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणती माहिती अप्राप्त आहे याबाबत पत्र देऊन त्याबाबतची यादी घेऊन विनामूल्य माहिती पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मांजरी, ता.राहुरी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०९/०२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांना कोणती माहिती अप्राप्त आहे याबाबत पत्र देऊन त्याबाबतची यादी घेऊन नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य माहिती पुरवावी. तसेच जी माहिती पुरविता येत नाही त्याबाबत स्पष्ट कारणे देखील कळविण्यात यावीत.

२) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ५०२/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

---

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र.५०२/२०२२/अहमदनगर/ओ- ७०८ दि: 03/07/2023